तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १८ जून २०२५

आतील पानावर

पान २– लग्नानंतर जिनिलियाला मिळेना सिनेमात
पान ३ – अल्लू अर्जुनलाही रेड्डींनी केले बाय बाय!
पान ४ – गश्मीर महाजनीचे दिग्दर्शनात पदार्पण
पान ५ – किरण रावबरोबरच्या नात्याबद्दल ...
पान ७– आलिया भट्टच्या नावात बदल?

# दीपिका साकारणार योध्दा

दिग्दर्शक संदिप वांगा आणि अभिनेता प्रभास यांच्या बहुचर्चित स्पिरिट चित्रपटातून अभिनेत्री दीपिका पादुकोणला बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. यानंतर बॉलीवूडमध्ये मोठी खळबळ उडाली होती. या चित्रपटात दीपिकाच्या जागी अभिनेत्री तृप्ती डिमरी हिला रेप्लेस करण्यात आले. अशातच दीपिकाच्या हातून कल्की २ हा चित्रपट गेल्याची बातमी समोर आली होती. अशातच आता एक सकारात्मक बातमी समोर आली आहे. अभिनेत्री दीपिका पदुकोण जवान चित्रपटाचा दिग्दर्शक ॲटिलच्या एका नव्या चित्रपटाचा भाग असणार आहे. यामुळे दीपिकाचे चाहते खूप उत्सुक झाले आहेत. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला असून, ॲटलीने नियम तोडले आणि ‘राणी विजयाकडे पुढे सरकते’ अशा कॅप्शनसह दीपिकाचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओला पाहून चाहते वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. ॲटलीच्या आगामी चित्रपटाचे नाव ‘एए २२ x ६ए असल्याचे सध्या तरी सांगितले जात आहे. या चित्रपटात आयकॅान स्टार अल्लून अर्जून देखील असणार आहे. दीपिका या चित्रपटात एका योद्ध्याची भूमिका साकारणार आहे. ती तलवारबाजी आणि घोडेस्वारी करतानाही दिसणार आहे. चित्रपटाचे अधिकृत नाव अद्याप निश्चित झालेले नाही. सध्या हा चित्रपट सध्या ‘एए२२ x एद६’ म्हणून ओळखला जातो. दीपिकाच्या ‘स्पिरिट’मधून बाहेर पडल्यानंतर त्यानंतर आलेल्या एकामागून एक आलेल्या बातम्यांमुळे मोठी खळबळ उडाली होती. या सगळ्या वातावरणात तिच्या विषयीची एक सकारात्मक बातमी मानली जात आहे.







## मला 'रेड २' ची ऑफर आली होती पण...

अजय देवगणच्या 'रेड' या चित्रपटात इलियाना डिक्रूझने मालिनीची भूमिका साकारली होती. ही भूमिका अजय देवगणच्या पत्नीची होती. या भूमिकेत इलियानालाही पसंती मिळाली. 'रेड २'मध्ये इलियाना दिसली नाही. तिच्या जागी वाणी कपूर दिसली. या रिप्लेसमेंटबद्दल अनेक गोष्टी बोलल्या जात होत्या. आता इलियानाने या प्रकरणावर मौन सोडले आहे. अलीकडेच तिच्या इन्स्टाग्रामवर चाहत्यांबरोबरच्या एका सेशनमध्ये, इलियानाने 'रेड २'मध्ये काम न करण्याबद्दल तिची बाजू मांडली. ती म्हणते की, दिग्दर्शक व निर्माते माझ्याशी संपर्क साधत होते; परंतु मी सध्या माझ्या मुलाचे संगोपन करण्यात व्यग्र आहे म्हणून मी हा चित्रपट करू शकले नाही. ती म्हणाली, मी तेव्हा नुकतेच माझ्या मुलाला जन्म दिला होता आणि आता माझे प्राधान्यक्रम वेगळे आहेत. इलियाना म्हणते की, मालिनीची भूमिका तिच्या हृदयाच्या खूप जवळ आहे. इलियानाने 'रेड २'मध्ये तिच्या जागी आलेल्या वाणी कपूरचेही कौतुक केले. ती म्हणाली, मी प्रोमोमध्ये वाणीला पाहिले होते, ती खूप सुंदर दिसत होती. इलियानाने नुकताच इन्स्टाग्राम एएमए सेशनमध्ये आई होण्याचा तिचा अनुभव शेअर केला. तिने सांगितले की, मातृत्व हा सर्वात कठीण; पण सर्वात सुंदर अनुभव आहे. जेव्हा चाहत्यांनी इलियानाला विचारले की, ती भविष्यात चित्रपटांमध्ये दिसणार का? तेव्हा तिने उत्तर दिले की, ती भविष्यात नक्कीच चित्रपटांमध्ये काम करेल. इलियानाचा शेवटचा चित्रपट 'दो और दो प्यार' होता. इलियानाने २०२३ मध्ये मायकल डोलनशी लग्न केले. अलीकडेच तिने दुसऱ्या गरोदरपणाची घोषणा केली आहे. 'रेड २' या चित्रपटात अजय देवगणने अमय पटनायकची भूमिका पुन्हा साकारली आहे; तर रितेश देशमुख आणि वाणी कपूर यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.

## लग्नानंतर जिनिलियाला मिळेना सिनेमात काम

बॉलिवूडमध्ये सध्या एका सिनेमाची चर्चा आहे. हा सिनेमा म्हणजे 'सितारे जमीन पर'. आमिर खान या सिनेमात प्रमुख भूमिकेत आहे. या सिनेमाच्या निमित्ताने आमिर खान आणि जिनिलिया देशमुख पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार आहेत. जिनिलियाने आमिरच्या मैत्रिणीची भूमिका केलेली दिसतेय. या सिनेमाच्या प्रमोशननिमित्त जिनिलियाने तिच्या मनातील खंत व्यक्त केली. लग्न झाल्यावर बॉलिवूडने साइडलाइन केलं, अशी खंत जिनिलीयाने व्यक्त केली. एका मुलाखतीत जिनिलिया म्हणाली, जेव्हा लोकांना कळालं की, मी सितारे जमीन परमध्ये काम करतेय तेव्हा मी किती नशीबवान आहे, आमिरसोबत सिनेमा करतेय, असं सर्वजण म्हणाले. खरंच आमिरचा हा मोठेपणा आहे आणि त्यांनी माझ्यात काहीतरी पाहिलं. त्यांनी माझं ऑडिशन घेतलं. परंतु तुम्हीही माझ्यासोबत असंच काही करु शकता? मला एखादी भूमिका देऊ शकता. पण तुम्ही तुमच्या मनात एक मर्यादा आखल्या आहेत. कदाचित माझं लग्न झाल्यामुळे मला अशा भूमिकांची गरज नाही, असं तुम्हाला वाटत असावं. फिल्म मेकिंग बदलली असल्याने आपल्या मानसिकतेमध्येही बदल करण्याची गरज आहे. जिनिलिया पुढे म्हणाली, एखाद्या भूमिकेचं वय बघता आपण त्याच वयातील एखाद्या कलाकाराला कास्ट केलं पाहिजे. भूमिकेचं वय जास्त असेल आणि तुम्ही एखाद्या लहान अभिनेत्याला कास्ट केलं तर त्या भूमिकेच्या बारीक पैलूंना ती व्यक्ती समजू शकत नाही. त्यामुळे योग्य भूमिका आणि कलाकार निवडणं गरजेचं आहे. सर्वांना संधी मिळेल, अशी मला आशा आहे, अशा शब्दात जिनिलीयाने तिचं मत व्यक्त केलंय. जिनिलियासोबतच्या २३ वर्षांच्या वयाच्या अंतराबद्दल आमिर म्हणाला, मला माहित होते की माझ्या आणि जिनिलियाच्या वयाबद्दल नक्कीच प्रश्न उपस्थित होतील. बराच काळ लोटला आहे आणि आता इम्रान खानही माझ्यापेक्षा खूप मोठा झाला आहे. आता आपल्याकडे व्हीएफएक्स आहेत. पुर्वी असं होतं की जर मला १८ वर्षांच्या मुलाची भूमिका करायची असेल तर मला प्रोस्थेटिक्सचा वापर करावा लागायचा. पण, आता वय कलाकारांसाठी अडथळा नाही.





## करीनाला वाटतो सलमान वाईट

'मिस्टर अँड मिसेस खन्ना, क्योंकी, बाजरंगी भाईजान आणि बॉडीगार्डमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली जोडी म्हणजे अभिनेत्री करीना कपूर आणि अभिनेता सलमान खान. या चित्रपटांतील दोघांची केमिस्ट्री प्रेक्षकांनी चांगलीच एन्जॉय केली. शिवाय सलमानच्या 'दबंग' चित्रपटात करीनाने एक गाणंही केलं. मात्र एकत्र काम करूनही करीना सलमानची चाहती नाहीय आणि सलमान खूप वाईट अभिनेता असल्याचं तिने स्वत:च एका मुलाखतीत सांगितलं होतं. खरंतर करीनाने सलमान खान, शाहरुख खान आणि आमिर खान या बॉलीवूडच्या तिन्ही खानबरोबर काम केलं आहे. तिघांबरोबर काम करणारी करीना तिच्या सुरुवातीच्या काळात शाहरुखची मोठी चाहती होती; पण तिला सलमान अजिबात आवडत नसे. एका जुन्या मुलाखतीत, करीनाने तिला 'सलमान आवडत नाही' असं सांगितलं होतं. करीनाने सांगितलेलं की, शाहरुख मला खूप आवडतो. त्याच्याबद्दल मला विचारू नका. मी त्याच्याबद्दल सुरुवात केली तर तासन् तास बोलत बसेन. त्याचा अभिनय मला कायमच भावतो. यानंतर जेव्हा करीनाला सलमान आणि आमिरबद्दल विचारण्यात आले होते तेव्हा ती म्हणालेली, मी सलमानची अजिबात चाहती नाही. मला तो आवडत नाही, तो खूप वाईट अभिनेता आहे. मी त्याला नेहमी सांगते की, तो बकवास बोलतो. त्यापेक्षा आमिर चांगला आहे, मला तो 'हम हैं राही प्यार के' आणि 'क्यूएसक्यूटी'मध्ये खूप आवडला होता, पण तिन्ही खानांमध्ये मी शाहरुखची चाहती आहे. दरम्यान, करीनाने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने बॉलीवूडचा एक काळ गाजवला आहे. करिअरमध्ये तिने अनेक यशस्वी आणि हिट चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. ती शेवटची अजय देवगणच्या 'सिंघम अगेन' चित्रपटात दिसली होती. या चित्रपटात करीनासह अक्षय कुमार, टायगर श्रॉफ, रणवीर सिंग, दीपिका पदुकोण, अर्जुन कपूर, रवी किशन, जॅकी श्रॉफ आदी कलाकार होते.



# ‘या’ चित्रपटासाठी रश्मिकाने केले कचऱ्याच्या ढिगाऱ्यात शूटिंग



नॅशनल रश्मिका मंदाना सध्या तिच्या आगामी ‘कुबेरा’ चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाद्वारे ती पहिल्यांदाच धनुष आणि नागार्जुनबरोबर स्क्रीन स्पेस शेअर करताना दिसणार आहे. अशा परिस्थितीत ती चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. त्याचे प्रमोशन चेन्नई येथून सुरू झाले आहे. दरम्यान, चित्रपटाचा ऑडिओ लाँच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये चित्रपटातील तिन्ही स्टार्सनी भाग घेतला आणि त्याबद्दलचे त्यांचे अनुभव शेअर केले. दरम्यान, धनुषने अभिनेत्रीबद्दल खुलासा केला की, त्याला आणि रश्मिकाला ६-७ तास कचर्याच्या ढिगार्यात राहावे लागले. त्याने रश्मिकाचे कौतुकही केले आणि म्हटले की तिला साधेपणाने संस्कार मिळाले आहेत. ‘कुबेरा’ चित्रपटातील ‘पिप्पी पिप्पी डम डम डम’ या गाण्याचा लाँचिंग कार्यक्रम मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात धनुषने चित्रपटाच्या शूटिंगचा अनुभव सांगितला आणि सांगितले की, त्याने आणि रश्मिका मंदानाने सुमारे ६-७ तास कचऱ्याच्या ढिगाऱ्यात चित्रपटाचे शूटिंग केले. या अनुभवाबद्दल बोलताना दाक्षिणात्य अभिनेत्याने पुढे सांगितले की, शूटिंगदरम्यान रश्मिका पूर्णपणे ठीक होती. तिला हा सीन करताना कोणतीही अडचण आली नाही, उलट ती म्हणत होती की तिला त्याचा वास येत नव्हता. धनुष इथेच थांबत नाही. तो पुढे म्हणतो की, तो अनेक ठिकाणी वाचतो की लोक मास्क घालून शूटिंग करतात. परंतु, अशा ठिकाणी शूटिंग करताना त्याला कोणतीही अडचण आली नाही आणि ते त्याच्यासाठी कठीणही नव्हते. धनुष पुढे म्हणाला की, या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान त्याच्या बालपणीच्या आठवणी ताज्या झाल्या. हा चित्रपट आनंद देणारा होता. तो अनेक कारणांमुळे या चित्रपटाबद्दल कृतज्ञ आहे. त्याला त्याच्या बालपणीच्या आठवणींमध्ये परत घेऊन जाणे हे त्यापैकी एक ठिकाण होते. अभिनेत्याने सांगितले की, देवाच्या कृपेने तो आज येथे आहे. अभिनेत्याने त्याच्या आयुष्यात सर्वकाही पाहिले आहे. जर आपण ‘कुबेरा’च्या प्रदर्शन तारखेबद्दल बोललो तर धनुष, रश्मिका आणि नागार्जुन यांचा चित्रपट २० जून २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. याशिवाय रश्मिकाकडे आणखी अनेक प्रोजेक्ट आहेत. यामध्ये द गर्लफ्रेंड, थामा आणि कॉकटेल २ सारख्या चित्रपटांची नावे आहेत.




# अल्लू अर्जुनलाही रेड्डींनी केले बाय बाय!

काही दिवसांपूर्वीच दिग्दर्शक संदीप वांगा रेड्डी यांनी त्यांच्या बहुचर्चित स्पिरिट सिनेमातून आघाडीची अभिनेत्री दीपिका पादुकोण हिला बाहेरचा रस्ता दाखवला. त्या पाठोपाठ आता संदीप रेड्डी यांनी अल्लू अर्जुनचाही पत्ता कट केल्याचं बोललं जात आहे. सिनेमाचं शूटिंगही थांबवलं गेल्याचं सांगण्यात येत आहे. मीडिया रिपोर्टनुसार, संदीप रेड्डी वांगा यांनी एका मोठ्या प्रोजेक्टमधून अल्लू अर्जुनला बाहेरचा रस्ता दाखवला आहे. गेल्या वर्षी अल्लू अर्जूनने संदीप रेड्डी यांच्यासोबत एक सिनेमा साइन केला होता. त्यातून आता अभिनेत्याचा पत्ता कट केला आहे. याबाबत कोणतीही ऑफिशियल माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, अल्लू अर्जुनच्या जागी आता या प्रोजेक्टमध्ये ज्युनियर एन टीआरची एन्ट्री झाल्याचंही सांगितलं जात आहे. दरम्यान, संदीप रेड्डींच्या सिनेमातून बाहेरचा रस्ता दाखवला गेला असला तरी अल्लू अर्जुन आणि दीपिका पादुकोण नव्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. साऊथ दिग्दर्शक ॲटली कुमारच्या सिनेमात त्यांची वर्णी लागली आहे. ‘एए२२ x ए६’ या सिनेमात दीपिका आणि अल्लू अर्जुन दिसणार आहेत. यामध्ये अल्लू अर्जुनचा डबल रोल असेल. २०२६ मध्ये हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

# “‘ऐस’ चित्रपटात विजय सेतुपति”

विजय सेतुपतिचा आगामी ॲक्शन चित्रपट ‘ऐस’चा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन अरुमुगाकुमारने केले आहे. या ट्रेलरमध्ये ॲक्शन, रोमान्स, थ्रिलर आणि ड्रामा दिसून येत आहे. या ट्रेलरमध्ये विजयची व्यक्तिरेखा मलेशियात दाखल होत असल्याचे दाखविण्यात आले असून तेथे तो स्वत:च्या भूतकाळाच्या सर्व खुणा मिटवू पाहत असाते, आता तो बोलड कन्नन नावाने ओळखला जातो. लवकरच तो रुक्मिणी वंसत साकारत असलेल्या व्यक्तिरेखेला भेटतो. यानंतर कन्नन एका गुप्त मोहिमेत सामील झाल्याचे दाखविण्यात आले आहे. विजय सेतुपतिचा हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटात विजय सेतुपतिसोबत योगी बाबू, रुक्मिणी वसंत, दिव्या पिल्लई, बबलू पृथ्वीराज, बी.एस. अविनाश, नागुलन जहरिनारिस, मुथु कुमार, राज कुमार, डेनेस कुमार, कार्तिक जय यांनी महत्त्वाची भूमिका साकारली आहे. चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शक अरुमुगाकुमारनेच केली आहे. तर चित्रपटाल संगीत जस्टिन प्रभाकरनने दिले आहे.



# आता 'इबलिस' कार्टी रुपेरी पडद्यावर!

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला की आता लढाई होणारत्यानंतर 'इबलिस' या चित्रपटाची सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली. नुकतंच या चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित झालं आहे. या पोस्टरमध्ये किल्ला, शाळेचं दप्तर, दुर्बीण, दूरध्वनी आणि भगवा झेंडा विशेष लक्ष वेधून घेत आहे. त्यामुळे चित्रपटप्रेमी प्रेक्षकांना काहीतरी हटके पाहण्याची पर्वणी लवकरचं मिळणार आहे. तेशा गर्ल चाइल्ड प्रोडक्शन आणि सार्थी एंटरटेनमेंट प्रस्तुत 'इबलिस' हा चित्रपट येत्या २० जून ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

पालकांना आणि शिक्षकांना गोंधळात टाकून इतिहास आठवायला लावणारी काही इबलिस मुलं येत आहेत तुम्हाला भेटायला. ही इबलिस कार्टी एक मोहीम आखतात आणि ती मोहीम तडीस नेण्यासाठी आपल्या विचारांशी समरस होऊन येणाऱ्या कठीण परिस्थितीवर कशी मात देतात. त्याची अनसुनी कहाणी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बंदुक्या फेम दिग्दर्शक राहुल मनोहर चौधरी यांनी इबलिस या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. तर अभिनेते नामदेव मुरकुटे यांनी या चित्रपटाची कथा पटकथा आणि संवाद लिहिले आहेत. तेशा गर्ल चाइल्ड प्रोडक्शन, सार्थी एंटरटेनमेंट आणि प्राजक्ता राहुल चौधरी यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. विजय निकम, पूनम शेंडे, अशोक केंद्रे, मंगेश सातपुते, नामदेव मुरकुटे आणि राजेश आहेर हे प्रमुख कलाकार असून यात ११ लहान मुलांनी देखील या चित्रपटात उत्तम अभिनय केला आहे. दिग्दर्शक राहुल मनोहर चौधरी 'इबलिस' चित्रपटाविषयी सांगतात, 'इबलिस' हा उर्दू शब्द आहे. अतिबुद्धिमान आणि सगळ्यांना त्रासदायक ठरणाऱ्या लहान मुलांना गावाकडे इबलिस म्हणून संबोधले जाते. या चित्रपटात अशीच ११ लहान मुलं आहेत त्यामुळे या चित्रपटाचं नाव इबलिस ठेवलं आहे. २०१७- १८ मध्ये माझ्या बंदुक्या या चित्रपटाला जे यश मिळाल, अनेक पुरस्कार मिळाले, भरभरून प्रेम मिळाल. त्यामुळे सामाजिक विषयांना धरून मनोरंजक चित्रपट करावा असं मी ठरवलं. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार लहान मुलांमध्ये कसे रुजवू शकतो हा विचार मी करत होतो. मग मी ६ महिने रिसर्च करून अनेक वर्कशॉक घेवून तसेच या चित्रपटाचे लेखक नामदेव मुरकुटे यांच्याशी चर्चा करून हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतल्याचे चौधरी म्हणाले.




# गश्मीर महाजनीचे दिग्दर्शनात पदार्पण

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनीने हिंदी मालिका व रिॲलिटी शोमध्ये दमदार काम केलं आहे. मागील अनेक वर्षांपासून प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करणारा गश्मीर आता एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गश्मीरने आतापर्यंत चित्रपट, हिंदी मालिका, वेब सीरिज व नृत्यामुळे प्रेक्षकांच्या मनात स्वतःचे एक स्थान निर्माण केले आहे. आता गश्मीर लेखक-दिग्दर्शक आणि निर्मात्याच्या भूमिकेत पदार्पण करत आहे. विशेष म्हणजे, त्याच्या वाढदिवसानिमित्ताने त्याने त्याच्या या पहिल्या चित्रपटाच्या मुहूर्ताची सोशल मीडियावर घोषणा केली. जीआरम्स इव्हेंट्स अँड प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेअंतर्गत या चित्रपटाची निर्मिती होत आहे. या चित्रपटाचे निर्माते गौरी महाजनी, माधवी महाजनी आणि गश्मीर महाजनी असून लेखन व दिग्दर्शन गश्मीर स्वतः करत आहे. अभिनय क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव असलेला गश्मीर आता कॅमेऱ्यामागे जाऊन एक नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण सुप्रसिद्ध डीओपी सत्यजीत शोभा श्रीराम यांच्या कॅमेऱ्यातून साकारले जात आहे. गश्मीरच्या या नव्या इनिंगबद्दल मराठी सिनेसृष्टीतूनही शुभेच्छांचा वर्षाव होत असून या चित्रपटाचं नाव आणि कलाकारांबद्दल जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. आपल्या या नवीन प्रवासाविषयी गश्मीर महाजनी म्हणाला, दिग्दर्शन हे माझं एक दीर्घकाळापासूनचं स्वप्न आहे. अभिनय करताना अनेक गोष्टी शिकल्या, अनुभवल्या आणि आत खोलवर काही सांगायचं राहून गेलं होतं. आता त्या भावना, ती विचारांची प्रक्रिया मी कॅमेऱ्याच्या मागून मांडणार आहे. चित्रपट ही एक सामूहिक कला आहे, मात्र काही कथा अशा असतात, ज्या फक्त आपल्या दृष्टिकोनातूनच सांगितल्या जाऊ शकतात. माझा हा चित्रपट म्हणजे माझ्या मनात कित्येक वर्षांपासून रुजत गेलेली कल्पना आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने ही गोष्ट सुरू करत असल्यामुळे हे एक भावनिक आणि प्रेरणादायी क्षण आहेत. ही जबाबदारी मोठी आहे, परंतु प्रेक्षकांचा विश्वास आणि प्रेम हेच माझं बळ आहे. दरम्यान, आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखल्या जाणाऱ्या गश्मीरने आतापर्यंत पडद्यावर अभिनय करून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं, आता तो नव्या भूमिकेत दिसणार आहे. त्याचं दिग्दर्शन असलेल्या या पहिल्यावहिल्या चित्रपटाबद्दल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. त्याच्या चित्रपटात कलाकार कोण असतील, ते अद्याप जाहीर करण्यात आलेलं नाही. शेअर केला होता. दरम्यान, अनन्या आणि आदित्य गेली दोन वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. दोघांना अनेकदा पापाराझींनी एकत्र पाहिलं आहे. याशिवाय करण्याच्या शोमध्ये अभिनेत्रीने स्वतः त्यांच्या नात्याबद्दल संकेत दिले होते.






# हिंदू हृदय सम्राज्ञी माता अहिल्यादेवी रुपेरी पडद्यावर

प्रत्येक मराठी हृदयाला गर्व असणाऱ्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवन प्रवास लवकरच नव्या कोऱ्या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधत हिंदू हृदय सम्राज्ञी माता अहिल्यादेवी हा चित्रपट मोठ्या पडद्यावर येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. स्वप्नील मुनोत प्रॉडक्शन आणि ओझोन एंटरटेनमेंट निर्मित हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आणत आहेत. धर्मभेद, जातीभेद, वर्णभेद मोडून काढणाऱ्या या राजमातेचा प्रवास मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत लेखक आणि दिग्दर्शक यांच्या नजरेतून समोर येणार आहे. स्वप्नील संजय मुनोत आणि धनंजय कृष्णा जाधव आणि चित्रपट निर्मिती संस्था अ.नगर फिल्म कंपनी गेल्या दोन वर्षांपासून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवन चरित्रावर एक चित्रपट साकारण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. जयकुमार मुनोत, अमोल खोले यांची सहनिर्मिती असलेला हा चित्रपट आहे. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आणि कार्य केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी एक आदर्श आहे. त्यांची न्यायप्रियता, लोककल्याणकारी धोरणे आणि समाजसेवेची भावना आजही आपल्याला मार्गदर्शक ठरतात या त्यांच्या जीवनगाथेला मोठ्या पडद्यावर आणणे, हा आमचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, ज्याद्वारे त्यांच्या महान कार्याची माहिती आजच्या पिढीला आणि जगाला करुन देता येईल, असं मत निर्मात्यांनी मांडलं आहे. पुढील वर्षी म्हणजेच २०२६ मध्ये मराठी मातीतलं भगवं वादळ म्हणजेच हिंदू हृदय सम्राज्ञी माता अहिल्यादेवी हा चित्रपट रुपेरी पडद्यावर येणार आहे. तर मराठीसह हा चित्रपट अन्य सहा भाषांमध्येही पाहता येणार आहे.

# किरण रावबरोबरच्या नात्याबद्दल आमिर म्हणाला...



आमिर खान त्याच्या खाजगी आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असतो. आमिरने त्याची पहिली पत्नी रिना दत्तासह वयाच्या २१ व्या वर्षी लग्न केलं होतं. आमिर व रिना यांना जुनैद व आयरा अशी दोन मुलं आहेत. या जोडीने १६ वर्षे एकमेकांसह संसार केल्यानंतर एकमेकांपासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आमिरने दिग्दर्शिका किरण रावसह लग्न केलं. किरण व आमिर यांना आझाद नावाचा एक मुलगा आहे. आमिरचं दुसरं लग्नही १६ वर्षे टिकलं, पण नंतर दोघांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. आता अभिनेता गौरी स्प्रॅटबरोबर रिलेशनशिपमध्ये असल्याचं त्याने काही दिवसांपूर्वीच सांगितलं होतं. आमिर खानने एका मुलाखतीमध्ये लग्नसंस्था, घटस्फोट आणि किरण रावबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं आहे. तो म्हणाला, भारतात लग्न हा फार महत्त्वाचा विषय मानला जातो. जेव्हा तुमच्या नात्यात कटुता निर्माण होते आणि तुम्ही विभक्त होण्याचा निर्णय घेता तेव्हा अनेकांना ते आवडत नाही आणि मलासुद्धा असंच वाटतं की लग्न हा फार महत्त्वाचा विषय आहे, त्याला हलक्यात घेऊ नये. पुढे रिना दत्ता व किरण या दोघींबरोबरच्या नात्याबद्दल बोलताना आमिर म्हणाला, रिनाबरोबरच्या नात्यामध्ये खरं बोलायचं झालं तर आम्ही एकत्र राहू शकत नव्हतो. असंच काहीसं किरणबरोबरही झालं. आम्हाला वेगळं होताना आनंद झाला नव्हता, पण अशा काही गोष्टी होत्या, ज्यामुळे आम्हाला हा निर्णय घ्यावा लागला. आमिर पुढे म्हणाला, किरण व तो जगासाठी नवरा बायको म्हणून आनंदी आहेत असं दाखवू शकले असते, पण यामुळे लग्नसंस्थेचा अपमान झाला असता. आम्ही एकत्र आनंदी नसतानाही कायमचे एकत्र राहू शकलो असतो आणि वैयक्तिक आयुष्यामध्ये काहीही करू शकलो असतो, पण शेवटी ते सगळं खोटं असलं असतं. आम्हा दोघांनाही तसं करणं योग्य वाटलं नाही, पुढे आमिर म्हणाला, नवरा बायको एरवी वेगळे होतात, कारण त्यांचं एकमेकांसह पटत नसतं, एकमेकांसह खूप भांडणं होत असतात. पण, किरण व माझ्यामध्ये कधीच तसं घडलं नाही, कारण आम्ही एकमेकांचा आदर केला. आम्हाला जे योग्य वाटलं आम्ही ते केलं.

# स्पाय युनिव्हर्समध्ये होणार विकीची एन्ट्री

विकी कौशलचा अलिकडचा चित्रपट 'छावा' ने बॉक्स ऑफिसवर शानदार कामगिरी करत २०२५ मधील कोणत्याही चित्रपटाला मागे टाकत एक विक्रम प्रस्थापित केला. दुसरीकडे, आलिया भट्ट YRF स्पाय युनिव्हर्सच्या पहिल्या महिला-प्रणीत चित्रपटात दिसणार आहे, ज्याने सर्वांना आश्चर्यचकित केले. माहितीनुसार, आता विकी देखील YRF च्या स्पाय युनिव्हर्समध्ये सामील होऊ शकतो. विकी कौशल देखील या विश्वात सामील होण्यासाठी चर्चेत आहे, ज्यामध्ये आधीच शाहरुख खान (पठाण), सलमान खान (टायगर) आणि हृतिक रोशन (वॉर) सारखे सुपरस्टार आहेत. या प्रकल्पात विकीचा सहभाग अद्याप अधिकृतपणे निश्चित झालेला नसला तरी, तो या फ्रँचायझीचा भाग होण्यासाठी उत्सुक आहे. एक नवीन कथा काम करत आहे, ज्यामध्ये विकी दिसू शकतो. असे वृत्त आहे की विकी कौशल शाहरुख, सलमान खान आणि हृतिक रोशन सारख्या स्वतंत्र चित्रपटात दिसू शकतो. शाहरुखच्या 'जवान'ला मागे टाकून 'चावा' या चित्रपटाच्या यशानंतर, निर्मात्यांचा असा विश्वास आहे की, शाहरुखच्या 'जवान'ला मागे टाकून आतापर्यंतचा तिसरा सर्वाधिक कमाई करणारा बॉलिवूड चित्रपट बनला आहे, विकीकडे वेगळ्या कथेचे नेतृत्व करण्याची ताकद आहे. जर सर्व काही व्यवस्थित राहिले तर, विक्कीचा धठक्र स्पाय युनिव्हर्स हा चित्रपट २०२६ पर्यंत प्रदर्शित होऊ शकतो आणि लवकरच एका दिग्दर्शकाची निवड केली जाईल. दरम्यान, YRF स्पाय युनिव्हर्समधील पुढील चित्रपट 'वॉर २' असेल, ज्यामध्ये हृतिक रोशन, ज्युनियर एनटीआर आणि कियारा अडवाणी यांची भूमिका असेल. हा चित्रपट ऑगस्ट २०२५ मध्ये प्रदर्शित होईल. त्यानंतर आलिया भट्ट आणि शर्वरीचा 'अल्फा' येईल.



# परेश रावल हेरा फेरी ३ मध्ये परतणार?



बॉलिवूडमधील आयकॉनिक कॉमेडी चित्रपट 'हेरा फेरी'चा तिसरा भाग सध्या चर्चेत आहे, परंतु चित्रपटाची चर्चा केवळ त्याच्या प्रदर्शनाची किंवा कथेची नाही तर चित्रपटाशी संबंधित वादांनाही वेग आला आहे. विशेषतः बाबुराव गणपतराव आपटे यांच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे परेश रावल 'हेरा फेरी ३' चा भाग नसल्याची बातमी समोर आल्यापासून. अलिकडेच एका सोशल मीडिया वापरकर्त्याने इन्स्टाग्रामवर परेश रावल यांना भावनिक आवाहन केले, लिहिले की, 'सर, पुन्हा विचार करा तुम्ही या चित्रपटाचे नायक आहात.' यावर परेश रावल यांनी दिलेल्या उत्तराने चाहत्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी लिहिले की, 'नाही हेरा फेरीमध्ये तीन नायक आहेत.' त्यांच्या या उत्तरामुळे हे स्पष्ट झाले की ते आता चित्रपटाचा भाग नाहीत आणि कदाचित त्यांच्या निर्णयावर ठाम आहेत. हे विधान सोशल मीडियावर अधिकाधिक व्हायरल होत आहे आणि चाहत्यांमध्ये निराशेचे वातावरण आहे. परेश रावल आणि 'हेरा फेरी ३' चे निर्माते अक्षय कुमार यांच्यात काही आर्थिक आणि कायदेशीर समस्या निर्माण झाल्या होत्या. असे म्हटले जात आहे की परेश रावल यांना चित्रपटातून वगळल्यानंतर अक्षय कुमारने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई देखील केली होती, ज्याला प्रतिसाद म्हणून परेश रावल यांनी चित्रपट निर्मात्यांना स्वाक्षरीची रक्कम व्याजासह परत केली. यावरून असेही दिसून येते की हा केवळ एक सर्जनशील फरक नव्हता तर एक गंभीर वाद होता. आता सर्वात मोठा प्रश्न म्हणजे 'हेरा फेरी ३' मध्ये बाबुरावची भूमिका कोण साकारणार? सोशल मीडियावरील अनेक वापरकर्त्यांचा असा विश्वास आहे की पंकज त्रिपाठी या भूमिकेसाठी एक मजबूत पर्याय असू शकतात. त्याच्या कॉमिक टायमिंग आणि अभिनय क्षमतेकडे पाहता, अनेक प्रेक्षकांना वाटते की तो ही आव्हानात्मक भूमिका साकारण्यास सक्षम आहे. तथापि, निर्मात्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. 'हेरा फेरी' चित्रपट आणि त्याच्या सिक्वेलने बॉलीवूड विनोदाला एक नवीन ओळख दिली. बाबुराव, श्याम आणि राजू या त्रिकुटाने लोकांना जितके हास्य दिले तितकेच आठवणीही दिल्या. अशा परिस्थितीत, तिसऱ्या भागातून लोकांना खूप अपेक्षा आहेत. पण जेव्हा या त्रिकुटातील एकही सदस्य बेपत्ता असतो तेव्हा चित्रपटाच्या आत्म्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

# मन सुद्ध तुझं... शांता आपटे

**'रात आयी है, नया रंग जमाने के लिए। लेके आराम का पैगाम, जमाने के लिए।।' तसेच 'कमसिनी के दिल मे। गम का बार क्यू?। वा रे किस्मत । पास गुल के खार क्यू?।।' ही गाणी पडद्यावर पाहिलेले रसिक आज हयात असतील तर कदाचित शंभरी पार केलेले असतील.**

१९३१ आजच्या आपल्या गायिका अभिनेत्री शांताबाई आपटे यांनी ही दोन्ही सुश्राव्य गाणी बोलपटाच्या सुरुवातीच्या काळात १९३४ सालच्या प्रभात कंपनीच्या 'अमृत मंथन' चित्रपटात आपल्या मधूर आवाजात गाऊन सुरुवातीलाच गाण्याचा दर्जा उंचावला होता. 'सुनो! सुनो! सुनो!, वन के प्राणी। बनी हुं आज, तुम्हारी राणी। तुम पेड खडे क्या करते। क्यू नही यहाँ पहरा देते?।।' शांताबाई यांनीच जंगलातील एका दृश्यात आपल्या स्वरकळेने हे गाणे श्रवणीय करून रजत पटावर अभिनितही केले होते. १९३६ सालच्या 'अमरज्योती' या प्रभातच्या चित्रपटात स्त्री मुक्ती चळवळीची व्यक्तिरेखा सुरेख साकारली.

मित्रहो, या सर्व प्रसंगांचा विचार चित्रपट पाहताना त्या काळात जाऊन करावा, जेव्हा एकाच कॅमेर्‍याने चित्रीकरण व्हायचे. संगीतातील बाशिंद्यांना अक्षरशः कलाकारांसमोर स्वतःला कॅमेर्‍यात येऊ न देता, चालत जाऊन प्रसंगी धावत जाऊन कधी बाजूच्या झाडाच्या फांदीवर बसून वाद्याची साथ द्यावी लागे. जेव्हा 'प्ले बॅक'चे तंत्र अवगत नव्हते, त्या काळातील ही गाणी आहेत. १९३१ साली पडदा बोलू व गाऊ लागला तेव्हापासून मराठी कलाकारांचे योगदान उल्लेखनीय होते. पहिला भारतीय बोलपट 'आलम आरा'चे नायक मा. विठ्ठल हे मराठी कलाकार होते. त्याचप्रमाणे 'क्लोज अप' हा प्रकारही सर्वप्रथम व्ही. शांताराम यांनी 'अमृतमंथन' या चित्रपटाद्वारे आणला. चित्रपट सबगोलंकारी माध्यम समजले जात होते. चांगल्या घरातील स्त्रिया दांभिक दुढ्ढाचार्यांच्या धाकाने धजावत नव्हत्या, त्या काळात मराठीतील दुर्गाबाई खोटे, लीलाबाई चिटणीस, शांताबाई आपटे, ललिता पवार, स्नेहप्रभा प्रधान या स्त्रियांनी धैर्याने विरोध झिडकारून चित्रपटाचा मार्ग सुकर केला. १९३२ साली सरस्वती मुव्हिटोन कंपनीच्या 'श्यामसुंदर' चित्रपटाद्वारे ९ वर्षांच्या शांताबाईंनी राधाची भूमिका साकारून पहिल्या चित्रपटातच अभिनयाची चमक दाखविली. पहिला बालचित्रपट होता तसेच पुण्यात निर्माण झालेलाही पहिला चित्रपट ठरला, ज्याचा मान शांताबाईंना मिळाला. पुढे चित्रपट माध्यमातून समाज प्रबोधन करण्यासाठी चित्रपती व्ही. शांताराम यांनी प्रभात कंपनीद्वारे मराठीत 'कुंकू' व हिंदीत 'दुनिया न माने' हा अजरामर चित्रपट काढून जरड विवाहाच्या कुप्रथेवर मोठा प्रहार केला. या चित्रपटात शांता आपटेंने अभिनयाचा कस लावून अभिनित केलेले नीरा (निर्मला) हे पात्र त्या काळापेक्षा कैक योजनेपुढे होते. ४० च्या दशकात व्ही. शांताराम यांनी 'कुंकू' सिनेमात नवीन प्रयोग केला व शांताबाईंनी पडद्यावर तो यशस्वी करून दाखविला.

शांता आपटे या देखण्या होत्या. तशाच निर्भीड व खंबीर होत्या. आजकाल अशांना दबंग म्हणतात. प्रभात कंपनीच्या व्यवस्थापनेने तेथील कर्मचार्‍यांवर केलेल्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आंदोलन व




उपोषण केले. स्टुडिओ बंद केला व सर्वांना न्याय मिळवून दिला. आर्थिक आमिष वा शोषणाला बळी न पडता केवळ आपल्या अभिनयावर व कामावर भर देण्याची शिकवणूक सर्वांना दिली. त्या काळी गाण्याच्या प्रसंगात कलाकार स्थिर राहून अभिनय करायचे. त्या शैलीत बदल करून नवी शैली प्रस्थापित केली. भारतीय सिनेसृष्टीत शांता आपटे सर्वात धीट अभिनेत्री होत्या. मोठमोठ्या निर्मात्या निर्देशकांशी त्या बेधडक व स्पष्ट बोलायच्या. कुणालाही आपल्या भोवती लाळ घोटू देत नव्हत्या.

एका चित्रपटातील एका प्रसंगाच्या रिहर्सलमध्ये नायक कलाकाराने काही गरज नसताना त्यांचा हात धरला. लगेच शांताबाईंनी त्याला कानशिलात लगावली. १९४५ साली 'सावन' चित्रपटातील तिचे नायक दिग्गज कलाकार मोतीलालबद्दल त्यांचे अनेक किस्से सांगतात. शांताबाईंनी त्यांच्या बरोबर आपल्या मर्यादा सांभाळून कामे केलीत. त्यांच्या या रोखठोक व दबंग वर्तनामुळे चित्रपटसृष्टीत त्यांच्या दबाव व वचक असायचा. संगीत व अभिनय या चित्तवृत्तींना जागृत करणाऱ्या कला आहेत. रसिक प्रेक्षकांच्या मानवी भावनांना स्पर्श करणारी गाण्यातील तीन मिनिटे विलक्षण ताकदीची असतात. शांताबाईंनी गायलेली गाण्यांची सुरावट लक्षणीय आहे. ती ऐकल्याशिवाय त्यातील माधुर्य कळत नाही.(१) ही सजीव सुमने देवा (२) आला आला श्रावण नाचत गात. (३) बाळा जो जो अंगाई (४) हे आपले घर (५) देवो खरा आधार (६) वीरा झोप सुखेन (७) माझं माहेरी (८) एक बानी एक वचनी एक पत्नी राम इ.

भारतीय चित्रपटातील श्रीगणेशाच्या काळातील या गायिका अभिनेत्रीचा जन्म. १९ मार्च १९२३ रोजी दुधणी येथे झाला. वडील रामचंद्र आपटे रेल्वेत होते व गायनाचा छंद होता. शालेय शिक्षण चौथीपर्यंत शाळेत, नंतर घरीच पूर्ण केले. पुण्यात बाबुराव केतकर व पंढरपुरात मा. कृष्णराव यांच्याकडून संगीत शिकल्या व नृत्याचे शिक्षणही घेतले. त्यांनी मराठी, हिंदी, गुजराती व तामिळ भाषेत मिळून ३१ चित्रपट केलेत. १९५३ पासून त्यांनी नवीन काम हाती घेतले. मराठी संगीत रंगभूमीला ऊर्जितावस्थेपासून वाचवून पुनर्जीवित केले. जुन्या गाजलेल्या अमर कलाकृती उदा. संगीत सौभद्र, मानापमान, लग्नाची बेडी, एकच प्याला इ.वर आपल्या गोड स्वरांचे प्रोक्षण करून ताजेतवाने केले. नवीन पिढीला संगीत नाटके पाहायला मिळाली ती शांताबाईंमुळे. 'ही सजीव सुमने देवा' यासारखे माधुर्य घराण्यातील गाणे म्हणणाऱ्या शांताबाई आपटे यांचे जीवनपुष्प २४ फेब्रुवारी १९६४ रोजी वयाच्या ४१ व्या वर्षी मुंबईतील अंधेरी मुक्कामी कायमचे सुकले. भारतीय चित्रपटसृष्टीच्या पहिल्या पिढीतील आद्य प्रवर्तकांमधील एक असणार्‍या शांताबाई आपटे कालवश झाल्या.

मराठी संगीत नाटकातील शास्त्रीय गायिका, मराठी, हिंदी चित्रपट तसेच दूरदर्शन मालिकात काम करणाऱ्या ज्येष्ठ व श्रेष्ठ अभिनेत्री नयना आपटे या शांताबाईंच्या कन्या आहेत. त्यांनी आपल्या आईसंबंधी सांगितले आहे- शांताबाई आपटे यांचा विवाह १९४७ साली त्यांच्या नात्यातील एका व्यक्तीशी झाला होता. दोन- तीन वर्षांनी त्या गर्भवती असतानाच त्यांचा घटस्फोट झाला. पुढे १९५० साली नयना आपटे यांचा जन्म झाला. त्या काळात म्हणजे १९४० च्या आधी मराठीतील सर्व स्त्री कलाकारांमध्ये अधिक मानधन घेणार्‍या शांताबाईंना १९३७ साली 'स्टार' दर्जा मिळाला होता. 'जाऊ मी सिनेमात?' या नावाने त्यांनी आत्मचरित्र लिहिले होते. त्यांचे चित्रपट जीवन नवीन पिढीतील विशेष करून स्त्री कलाकारांना मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही. चित्रपटातील त्यांच्या अथक योगदानामुळे चित्रपटसृष्टी समृद्ध झाली, हे तितकेच सत्य आहे. 'कुंकू' या त्यांच्याच चित्रपटातील गाण्यासारख्या आयुष्य त्या जगल्या. **'मन सुद्ध तुझं, गोष्ट हाये, पृथ्वी मोलाची। तू चाल पुढं तुला रं गड्या, भीती कुणाची,पर्वाही कुणाची...।।'**

**रमेश पोफळी**

# 'ही' अभिनेत्री बनली मालदीवची ब्रँड ॲम्बेसेडर



मालदीव मार्केटिंग अँड पब्लिक रिलेशन्स कॉर्पोरेशनने जाहीर केले आहे की बॉलीवूड स्टार आणि स्टाईल आयकॉन 'कतरिना कैफ' आता मालदीवच्या 'सनी साइड ऑफ लाईफ'ची जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर असेल. ही भागीदारी अशा वेळी आली आहे जेव्हा व्हिजिट मालदीवने त्यांची विशेष उन्हाळी विक्री मोहीम सुरू केली आहे, ही मोहीम जगभरातील प्रवाशांना मालदीवच्या समुद्रकिनारी असलेल्या सौंदर्याकडे आकर्षित करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. कतरिना कैफ केवळ एक अभिनेत्री नाही तर एक यशस्वी उद्योजक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व देखील आहे. अनेक हिट चित्रपट, असंख्य पुरस्कार आणि फोर्ब्स आयकॉन ऑफ एक्सलन्ससह, तिने केवळ पडद्यावरच नव्हे तर उद्योगाबाहेरही स्वतःसाठी एक नवीन ओळख निर्माण केली आहे. या नवीन भूमिकेबद्दल बोलताना कतरिना म्हणाली, मालदीव हे माझ्यासाठी फक्त एक ठिकाण नाही, तर एक अनुभव आहे. एक असे ठिकाण जिथे निसर्ग त्याच्या सर्वात सुंदर स्वरूपात आढळतो. येथे शांती आणि उत्कटतेचे मिश्रण दिसते. मी 'सनी साईड ऑफ लाईफ'चा चेहरा होत आहे याचा मला खूप आनंद आहे. व्हिजिट मालदीवचे सीईओ इब्राहिम शिउरे म्हणाले, कॅटरीनाची ऊर्जा, जागतिक आकर्षण आणि लाखो लोकांच्या हृदयाशी असलेले कनेक्शन तिला आमच्या ब्रँडची खरी प्रतिनिधी बनवते. मालदीवसाठी हा एक नवीन अध्याय आहे, जो सलग पाच वर्षांपासून जगातील सर्वोच्च पर्यटन स्थळ म्हणून स्थान मिळवत आहे, विशेषतः आमच्या उन्हाळी विक्री दरम्यान, जेव्हा आम्ही जगभरातील प्रवाशांना आमंत्रित करत आहोत. ही कॅम्पेन भारत, यूके, रशिया, इटली, स्पेन, पोलंड आणि डच देशांमध्ये प्रमुख बाजारपेठांमध्ये सक्रिय आहे. पण विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की, कतरिना भारतात तसेच आशियाई देशांमध्ये प्रसिद्ध आहे, पण ती पश्चिमेकडील लोकांना आकर्षित करू शकेल का?

# कंगना करणार हॉलिवूडमध्ये एंट्री

कंगना रनौत बॉलिवूडमध्ये स्वत:च्या अभिनयाची जादू दाखविल्यावर आता हॉलिवूडमध्ये पाऊल ठेवणार आहे. प्रियांका चोप्राप्रमाणे ती देखील हॉलिवूडमध्ये नशीब आजमाविणार आहे. तिच्या हाती एक मोठा प्रोजेक्ट लागला असून यात ती स्कार्लेट स्टेलॉन आणि टायलर पोसीसोबत दिसून येणार आहे. हा एक हॉरर ड्रामा असून याचे नाव 'ब्लेस्ड बी द इव्हिल' आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण न्यूयॉर्कमध्ये पार पडणार आहे. सध्या प्रॉडक्शन टीम स्थळांचा शोध घेत आहे. कंगना रनौतचे मागील काही चित्रपट फ्लॉप ठरले आहेत. अशा स्थितीत तिने आता हॉलिवूडची वाट पकडली आहे. कंगनाने काही वर्षांपूर्वी हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करणार नसल्याचे वक्तव्य केले होते. कंगनाने २०१७ साली हॉलिवूडमध्ये काम करणाऱ्या कलाकारांना मुर्ख संबोधिले होते. परंतु आता तिने स्वत:च्या भूमिकेत बदल करत हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला आहे. 'ब्लेस्ड बी द एव्हिल' या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग रुद्र करणार आहे. चित्रपटाची कहाणी पाश्चिमात्य पार्श्वभूमीवर आधारित भारताच्या पारंपरिक लोककथेवर आधारित असणार आहे. परंतु कंगनाच्या या चित्रपटातील भूमिकेसंबंधी खुलासा करण्यात आलेला नाही. कंगना हॉलिवूडपटात दिसणार असल्याने चाहते उत्सुक झाले आहेत.



अभिनेत्री आलिया भट्टने नुकतंच 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावत पदार्पण केलेलं. अशातच अभिनेत्रीने आता त्यादरम्यानचा एक व्हिडीओ तिच्या यूट्यूब चॅनेलवरून शेअर केला आहे. यामध्ये तिने कान्स फिल्म फेस्टिव्हलदरम्यान केलेल्या सर्व लूकसाठी कशी तयारी केली हे पाहायला मिळत आहे. परंतु, या व्हिडीओमधील एका गोष्टीने तिच्या चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे. आलियाने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये तिने 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'मधील काही खास क्षण दाखवले आहेत. यावेळी ती रेड कार्पेटसाठी तयारी करत असल्याचं दिसत आहे. या व्हिडीओमध्ये आलिया भट्ट तयारी करत असलेल्या रुममध्ये तिच्यासाठी एक नोट लिहिलेली दिसते, ज्यावर तिचं नाव आलिया कपूर असं लिहिलेलं पाहायला मिळतं. यावरून आलियाने रणबीर कपूरसह लग्न केल्यानंतर तिचं भट्ट हे आडनाव न लावता नवऱ्याचं आडनाव आपल्या नावामागे जोडल्याचं म्हटलं जात आहे. आलियाने शेअर केलेल्या व्हिडीओमधील तिचं आलिया कपूर असं नाव लिहिलेला फोटो तिच्या एका चाहत्याने सोशल मीडियावर पोस्ट केला, ज्याने तिच्या चाहत्यांचं लक्ष वेधलं. तिच्या त्या चाहत्याच्या मते अभिनेत्रीने कागदोपत्री तिच्या नावामागे रणबीर कपूरचं कपूर हे आडनाव जोडलं असेल आणि बहुतांश लोक तिला भट्ट या आडनावानेच ओळखत असल्याने तिने त्यांच्यासाठी तेच राहू दिलं असावं. तर दुसऱ्याने म्हटलं आहे, तिला कोणतं आडनाव नावामागे जोडायचं आहे हा सर्वस्वी तिचा निर्णय आहे.

# आलिया भट्टच्या नावात बदल?

पण, तरी मला असं वाटतं की आलिया भट्ट याच नावात जास्त वजन आहे. आलिया कपूर खूपच सामान्य वाटतं आणि मला असं वाटतं की, दक्षिण दिल्लीत आलिया कपूर या नावाने अनेक मुली असतील, त्यामुळे निदान तिने लोकांसाठी तरी आलिया भट्ट हेच नाव ठेवावं. आलिया भट्टच्या आलिया कपूर या नावावरून एका नेटकऱ्याने असंही म्हटलं आहे, आलियाने कागदोपत्री तिचं नाव आलिया कपूर असं केलं असावं, म्हणून त्या हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी तिचं नाव आलिया कपूर असं लिहिलं असेल. दरम्यान, आलिया भट्ट व रणबीर कपूर यांनी २०२२ रोजी लग्न केलं होतं. या जोडप्याला राहा नावाची मुलगी आहे. सध्या आलियाच्या कपूर आडनावावरून जरी चर्चा होत असली तरी लग्नानंतर काम केलेल्या एकाही चित्रपटात अभिनेत्रीने तिच्या नावामागे कपूर हे आडनाव जोडल्याचं दिसलं नाही.



प्राइम व्हिडिओवरील अत्यंत लोकप्रिय फॅमिली मॅन ३ वेबसिरीजचा तिसरा सिजन कधी येणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. याबाबत एक अपडेट समोर आली आहे. अभिनेता मनोज वाजपेयी याने तिसऱ्या सिजनची रिलीज डेट सांगितली आहे. फॅमिली मॅन ही खूप लोकप्रिय झालेली वेबसिरीज आहे. या सिरीजच्या याआधीच्या दोन्ही सिजनने धूमाकूळ घातला होता. त्यानंतर या सिरीजचा तिसरा सिजन कधी येणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. अखेर आता प्रतिक्षा संपली असून, ३ नोव्हेंबर २०२५ मध्ये ही वेबसिरीज स्ट्रीम होईल, असे सांगण्यात आले आहे. फॅमिली मॅन ही प्राइम व्हिडिओ ओटीटीवरील बहुचर्चित वेबसिरीज आहे. द इकॉनॉमिक टाईम्सच्या मते, ओटीटीप्ले अवॉर्ड्स २०२५ दरम्यान, मनोज बाजपेयी याने तिसऱ्या सीझनची प्रीमियर डेट सांगितली आहे. मनोज याच्या म्हणण्यानुसार 'द फॅमिली मॅन ३' नोव्हेंबर २०२५ मध्ये स्ट्रीम होईल. यामुळे तिसऱ्या सिजनमध्ये काय खास असणार याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. या वेबसिरीजचा तिसरा सिजन आधीच्या दोन सिजनपेक्षा ॲक्शनने भरलेला असणार आहे. या नव्या सिजनमध्ये अभिनेता जयदीप अहलावत याची एन्ट्री होणार असून, तो सिरीजमध्ये खलनायकाच्या भूमिकेत असणार आहे. जयदीप अहलावत हा त्याच्या स्क्रिन प्रेझेन्ससाठी ओळखला जातो. त्याला या वेबसिरीजमध्ये पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. 'द फॅमिली मॅन ३' चं दिग्दर्शनाची जबाबदारी पुन्हा एकदा राज आणि डीके सांभाळणार आहेत.

# फॅमिली मॅन ३ या दिवशी होणार रिलीज



# प्रियांकाने नाकारली 'ही' भूमिका



नितेश तिवारी यांचा बहुप्रतीक्षित 'रामायण' हा चित्रपट सतत चर्चेत असतो. गेल्या अनेक दिवसांपासून चित्रपटाच्या स्टारकास्टबाबत चर्चा सुरू आहे. आता अशी माहिती समोर येत आहे, ज्यामध्ये प्रियांका चोप्रादेखील या चित्रपटाचा भाग असणार असल्याचे म्हटले जात आहे. निर्मात्यांनी प्रियांकाला एका महत्त्वाच्या भूमिकेसाठी संपर्क साधला होता. चित्रपटाशी संबंधित एका सूत्राने सांगितले की, निर्मात्यांना या महाकाव्य पौराणिक कथेत अभिनेत्री प्रियांका चोप्रालाही कास्ट करायचे होते. यासाठी निर्मात्यांनी प्रियांकाशीही संपर्क साधला होता. माहितीनुसार, निर्मात्यांना प्रियांकाला शूर्पणखाच्या भूमिकेत कास्ट करायचे होते. त्यासाठी निर्मात्यांनी अभिनेत्रीशी संपर्क साधला होता, परंतु तारखांमुळे प्रियांका या भूमिकेसाठी हो म्हणू शकली नाही. तिच्या जागी शूर्पणखाच्या भूमिकेसाठी रकुल प्रीत सिंहची निवड झाली आहे. चित्रपटाशी संबंधित एका सूत्राने पुढे सांगितले की, प्रियांकानंतर आता रकुल प्रीत सिंहची शूर्पणखाच्या भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे. ती या भूमिकेसाठी अगदी योग्य आहे. तिने तिच्या भूमिकेसाठी खूप मेहनतही घेतली आहे. 'रामायण'च्या इतर कलाकारांबद्दल बोलायचे झाले, तर चित्रपटात रणबीर कपूर भगवान रामाच्या भूमिकेत दिसणार आहे, तर कन्नड स्टार यश रावणाची भूमिका साकारणार आहे. याशिवाय साई पल्लवी तिच्या पहिल्या हिंदी चित्रपटात सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे, तर अमिताभ बच्चन जटायूची भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. माहितीनुसार, लारा दत्ता कैकेयी आणि काजल अग्रवाल मंदोदरीच्या भूमिकेत दिसणार आहेत. 'रामायण' दोन भागात प्रदर्शित होणार आहे. त्याचा पहिला भाग २०२६ मध्ये आणि दुसरा २०२७ मध्ये येण्याची अपेक्षा आहे. नितेश तिवारी यांच्या 'रामायण' या चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. ८०० कोटींच्या बजेटमध्ये बनलेला हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात महागड्या चित्रपटांपैकी एक मानला जातो. यात रणबीर कपूर, साई पल्लवी, यश, सनी देओल, रवी दुबे आणि रकुल प्रीत सिंह यांच्यासह अनेक कलाकार आहेत; ज्यांना राम, सीता, हनुमान आणि रावणाच्या भूमिकांसाठी साइन करण्यात आले आहे.

# सिद्धार्थसोबत जमणार तमन्नाची जोडी



अभिनेता बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा हा स्वत:ची व्यक्तिरेखा प्रभावीपणे साकारण्यासाठी मेहनत घेण्यासाठी ओळखला जातो. सिद्धार्थच्या आगामी चित्रपटाची सध्या चर्चा सुरू असून याचे दिग्दर्शन दीपक मिश्रा करत आहे. आता या चित्रपटातील नायिकेचे नाव निश्चित झाले आहे. सिद्धार्थची मुख्य भूमिका असलेल्या चित्रपटाचे नाव वन फोर्स ऑफ द फॉरेस्ट असून तो एक पौराणिक थ्रिलरपट आहे. याचमुळे या चित्रपटाबद्दल उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटात आता सिद्धार्थची नायिका म्हणून तमन्ना भाटिया दिसून येणार आहे. तमन्ना स्वत:च्या अभिनयासोबत नृत्यकौशल्यासाठी ओळखली जाते. स्त्री २ चित्रपटातील तिच्या गाण्याला प्रेक्षक अन् चाहत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला होता. सिद्धार्थसोबत तिची जोडी जमणार असल्याने दोघांच्याही चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण लवकरच सुरू होणार आहे. तर पुढील वर्षी हा चित्रपट प्रदर्शित करण्याची निर्मात्यांची योजना आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने सिद्धार्थ आणि तमन्ना पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत.